**L. A. BILL No. I OF 2021.**

A BILL

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA STAMP ACT.

**सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक १.**

**महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक.**

**(विधानसभेने दिनांक ३ मार्च २०२१ रोजी संमत केल्याप्रमाणे)**

**(विधानपरिषदेने दिनांक ४ मार्च २०२१ रोजी कोणत्याही शिफारशींशिवाय परत केल्याप्रमाणे)**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते ;

१९५८ चा ६०. **आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात २०२१ चा महा. अध्या. १. असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती ; आणि, म्हणून, त्यांनी दिनांक ९ फेब्रुवारी २०२१ रोजी महाराष्ट्र मुद्रांक (सुधारणा व विधिग्राह्यीकरण) अध्यादेश, २०२१ हा प्रख्यापित केला होता ;

**आणि ज्याअर्थी**, उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रुपातंर करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या बाहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र मुद्रांक (सुधारणा व विधिग्राह्यीकरण) अधिनियम, २०२१, असे म्हणावे.

(२) तो, दिनांक ९ फेब्रुवारी २०२१ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

सन १९५८ चा अधिनियम क्रमांक ६० याच्या कलम ५ याऐवजी नवीन कलम दाखल करणे.

**२.** महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम (यात यापुढे ज्याचा निर्देश, "मुख्य अधिनियम" असा केला आहे) याच्या कलम ५ ऐवजी, पुढील कलम दाखल करण्यात येईल आणि ते, ११ ऑगस्ट २०१५ पासून दाखल करण्यात आल्याचे मानण्यात येईल :— १९५८ चा ६०.

अनेक विविध बाबींशी किंवा व्यवहारांशी संबंधित असणारे संलेख.

"**५**. अनेक विविध बाबींचा किंवा संव्यवहारांचा समावेश असणाऱ्या किंवा अशा बाबींशी किंवा संव्यवहारांशी संबंधित असणाऱ्या कोणत्याही संलेखावर, अशा बाबींपैकी किंवा संव्यवहारांपैकी एका बाबीचा किंवा संव्यवहाराचा समावेश असणाऱ्या अथवा एका बाबीशी किंवा संव्यवहाराशी संबंधित असणाऱ्या, प्रत्येक स्वतंत्र संलेखावर, या अधिनियमान्वये जी शुल्के आकारण्यायोग्य असतील त्या शुल्कांची एकुणातील रक्कम आकारण्यात येईल.".

सन १९५८ चा अधिनियम क्रमांक ६० याच्या अनुसूची एकची सुधारणा.

**३.** मुख्य अधिनियमाच्या अनुसूची एक मधील,—

(क) अनुच्छेद ६ मध्ये,—

(एक) खंड (१) मधील, उप-खंड (ब) मधील, स्तंभ (२) मध्ये, "०.२ टक्के" या मजकुराऐवजी, "०.३ टक्के" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(दोन) खंड (२) मधील, उप-खंड (ब) मधील, स्तंभ (२) मध्ये, "०.२ टक्के" या मजकुराऐवजी, "०.३ टक्के" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(तीन) खंड (२) नंतर, पुढील खंड जादा दाखल करण्यात येईल :—

| | |
|---|---|
| "(३) या अनुच्छेदांतर्गत येणारा संलेख, जेव्हा सांपार्श्विक किंवा सहाय्यकारी किंवा अतिरिक्त प्रतिभूती म्हणून निष्पादित केला असेल तेव्हा आणि जेव्हा या अनुच्छेदांतर्गत प्रमुख किंवा मूळ प्रतिभूतीवर योग्य शुल्क प्रदान करण्यात आले असेल त्याबाबतीत. | पाचशे रुपये."; |

(ख) अनुच्छेद ४० मध्ये, खंड (ब) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येईल :—

"(ब) जेव्हा उपरोक्तप्रमाणे कब्जा दिलेला नसेल किंवा देण्याचे मान्य केले नसेल तेव्हा,—

| | |
|---|---|
| (एक) जर अशा विलेखाद्वारे प्रतिभूत केलेली रक्कम पाच लाख रुपयांहून अधिक नसेल तर, | शंभर रुपयांच्या किमान मर्यादेस अधीन राहून, अशा विलेखाद्वारे प्रतिभूत केलेल्या रकमेच्या ०.१ टक्के ; |
| (दोन) इतर कोणत्याही प्रकरणी, | दहा लाख रुपयांच्या कमाल मर्यादेस अधीन राहून, अशा विलेखाद्वारे प्रतिभूत केलेल्या रकमेच्या ०.३ टक्के;". |

विधिग्राह्यीकरण.

**४.** (१) कोणत्याही न्यायालयाचा कोणताही न्यायनिर्णय, हुकूमनामा किंवा आदेश यांमध्ये किंवा मुख्य अधिनियमामध्ये एतद्विरुद्ध काहीही अंतर्भूत असले तरीही, मुख्य अधिनियमाच्या कलम ५ आणि अनुसूची एक मधील अनुच्छेद ६ व ४० च्या तरतुदींन्वये असे मूल्यनिर्धारण, बसवणे व वसुली या अनुषंगाने उक्त अधिनियमाखालील

प्राधिकाऱ्यांनी, केलेली किंवा करण्याचे अभिप्रेत असलेली कोणतीही कारवाई यांसह मूल्यनिर्धारित केलेले, बसविलेले आणि वसूल केलेले मुद्रांक शुल्क हे महाराष्ट्र मुद्रांक (सुधारणा व विधिग्राह्यीकरण) अधिनियम, २०२१ (यात यापुढे या कलमात ज्याचा निर्देश "सुधारणा अधिनियम" असा केला आहे) याद्वारे सुधारणा केलेल्या, उक्त कलम ५ आणि अनुच्छेद ६ व ४० च्या तरतुदी जणू काही सर्व महत्त्वाच्या वेळी निरंतर अमलात होत्या असे समजून, कायद्यानुसार विधिग्राह्यरीतीने बसविण्यात व वसूल करण्यात आले असल्याचे मानण्यात येईल आणि त्यानुसार,—

२०२१ चा महा.

(अ) मुद्रांक शुल्क बसविण्याच्या आणि वसूल करण्याच्या संबंधात मुख्य अधिनियमान्वये प्राधिकाऱ्यांनी केलेल्या किंवा हाती घेतलेल्या सर्व कारवाया, कार्यवाह्या किंवा गोष्टी, सर्व प्रयोजनांसाठी, मुख्य अधिनियमाच्या तरतुदींनुसार करण्यात आल्या असल्याचे किंवा हाती घेण्यात आल्या असल्याचे मानण्यात येईल ;

(ब) अशाप्रकारे बसविलेल्या आणि वसूल केलेल्या मुद्रांक शुल्काच्या परताव्यासाठी उक्त प्राधिकाऱ्यांविरुद्ध कोणत्याही न्यायालयात कोणताही दावा किंवा इतर कार्यवाही दाखल करण्यात येणार नाही किंवा चालविता येणार नाही ;

(क) कोणतेही न्यायालय किंवा इतर कोणताही प्राधिकारी, अशाप्रकारे बसविलेल्या किंवा वसूल केलेल्या मुद्रांक शुल्काच्या परताव्याचा निदेश देणाऱ्या कोणत्याही हुकूमनाम्याची किंवा आदेशाची अंमलबजावणी करणार नाही.

(२) शंका निरसनार्थ, याद्वारे, असे घोषित करण्यात येते की, पोट-कलम (१) मधील कोणत्याही गोष्टीमुळे, एखाद्या व्यक्तीला,—

(अ) पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या मुद्रांक शुल्काच्या अशा कोणत्याही निर्धारणास, पुनर्निर्धारणास, बसवण्यास किंवा वसुलीस, सुधारणा अधिनियमाद्वारे सुधारणा केलेल्या, मुख्य अधिनिमाच्या तरतुदींनुसार हरकत घेण्यास ; किंवा

(ब) सुधारणा अधिनियमाद्वारे सुधारणा केलेल्या, मुख्य अधिनियमान्वये मुद्रांक शुल्काच्या मार्गाने तिच्याकडून देय असलेल्या रकमेपेक्षा अधिक असलेल्या, मुख्य अधिनियमान्वये तिने भरणा केलेल्या कोणत्याही मुद्रांक शुल्काच्या परताव्याची मागणी करण्यास,

प्रतिबंध होतो, असा अन्वयार्थ येणार नाही.

सन २०२१ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १ याचे निरसन व व्यावृत्ती.

**५.** (१) महाराष्ट्र मुद्रांक (सुधारणा व विधिग्राह्यीकरण) अध्यादेश, २०२१, हा याद्वारे, निरसित करण्यात येत आहे. २०२१ चा महा. अध्या. १.

(२) अशा प्रकारे निरसन झाले असले तरी, उक्त अध्यादेशाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती किंवा कोणतीही कार्यवाही (काढण्यात आलेली कोणतीही अधिसूचना किंवा दिलेला आदेश यांसह) ही, या आधिनियमान्वये सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती, कार्यवाही किंवा, यथास्थिती, काढण्यात आलेली अधिसूचना किंवा दिलेला आदेश असल्याचे मानण्यात येईल.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक १.]**

**[ महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक.]**

[**श्री. बाळासाहेब थोरात,**
महसूल मंत्री.]

[**विधानसभेने दिनांक ३ मार्च २०२१ रोजी संमत केल्याप्रमाणे**]

[विधानपरिषदेने दिनांक ४ मार्च २०२१ रोजी कोणत्याही शिफारशींशिवाय परत केल्याप्रमाणे]

**राजेन्द्र भागवत,**
सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई